# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग

महिला व बाल विकास विभागामार्फत रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पूर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वंकष योजना म्हणून "फिरते पथक"ही योजना राबविण्यास महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक- बालक २०२५/प्र. क्र.०२/का.९ दि. १९/०६/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता २८ महानगरपालिका क्षेत्रांत प्रत्येकी १ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबई शहारासाठी १, मुंबई उपनगर (पूर्व) साठी १ व मुंबई उपनगर (पश्चिम) साठी १ याप्रमाणे एकूण ३१ "फिरते पथक" सुरू करण्यात येणार आहेत.

तदनुषंगाने उपरोक्त ३१ "फिरते पथक" सुरू करणे बाबत दि. १९/०६/२०२५ च्या शासन निर्णयांमध्ये नमूद करण्यात आलेल्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी संस्थानी विहित नमुन्यात तीन प्रति मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज संबंधित जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयामध्ये जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत. सदर योजनेसंदर्भातील मार्गदर्शक सूचना,अर्ज, अटी शर्ती व इतर माहिती www.maharashtra.gov.in व https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी "फिरते पथक" ही योजना कायमस्वरूपी राबविण्यासाठी संस्थेमार्फत करावयाच्या करिता अर्ज नमूना**

अर्जदार संस्थेचे नाव
पत्ता:-
दिनांक

प्रति

आयुक्त,
महिला व बाल विकास, पुणे
मार्फत,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक ही योजना -------------- या संस्थेमार्फत राबविण्यासाठी महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-बालके-२०२५/प्र. क्र.०२/का. ९, दि. १९/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील संस्था निवडीच्या निकषानुसार खालील कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. स्वयंसेवी संस्थेची घटना व नियमावली.
२. सदर स्वयंसेवी संस्थेचे मुबई विश्वस्त अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.
३. संस्थेचे निती आयोग पोर्टलवरील नोंदणी प्रमाणपत्र
४. स्वयसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्याना पोलीस विभागाने दिलेले चरित्र्य पडताळणी प्रमाणपत्र,
५. संस्थेच्या नावावर बँकेमध्ये अर्ज करते वेळी किमान रु.१५.०० लक्ष एवढा बॅलन्स असल्याबाबतचे बँकेचे प्रमाणपत्र
६. स्वयंसेवी संस्थेचे मागील ३ वर्षांचे ऑडिट रिपोर्ट व वार्षिक अहवाल (सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४)
७. स्वयंसेवी संस्थेला बाल कल्याण क्षेत्रामधील कामाचा किमान ३ वर्ष अनुभव असल्याचे कार्य अहवाल (सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४)
८. संस्थेमधीत प्रशिक्षित कर्मचारी (Ms अनुभव असलेला समुपदेशक, पदवी/ पदविकाधारक शिक्षिका/शिक्षक, किमान १० वी पास व ५ वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव असलेला वाहन चालक व बालकांशी संबंधित कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेला असलेली काळजीवाहक) यांची यादी प्रस्तावासोबत जोडण्यात आली आहे.
९. योजनेकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनाचा भाडे करारनामा तपशील.
१०. खाली नमूद बाबींची पुर्तता करण्यास पात्र असल्याबाबतचे हमीपत्र
    १. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असल्याबाबत,
    २. अनुदान प्राप्त होईपर्यंत स्व-खर्चाने प्रकल्प राबविण्याबाबत,
    ३. स्वयंसेवी संस्था व संस्थेचे सभासद हे काळ्या यादीत नाहीत याबाबत प्रमाणपत्र/ हमीपत्र,
    ४. संस्थेच्या कार्यकारी मंडळामध्ये कोणताही पदाधिकारी/सदस्य हा शासकीय सेवेत नसल्याबाबत,
    ५. मान्यता मिळाल्यानंतर संस्थेस वाहनात केलेल्या सुधारणांबाबत सक्षम यंत्रणेकडून दिलेले प्रमाणपत्र (RTO/authorised Dealer) वाहनाची कागदपत्रे (RC Book/

Insurance/Pollution/ वाहन सुस्थितीत असल्याबाबतचे RTO चे प्रमाणपत्र) योजना कार्यान्वित करतेवेळी सादर करणे बंधनकारक असेल, याबाबतचे हमीपत्र

६. मान्यता मिळाल्यानंतर सदर वाहनामध्ये CCTV Camera तसेच Tracking System योजना कार्यान्वित करतेवेळी बसविणेबाबतचे हमीपत्र
७. मान्यतेनंतर, संस्थेमार्फत सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बाबत हमीपत्र
८. मान्यतेनंतर वाहनामध्ये अद्ययावत प्रथमोपचार पेटी ठेवणे, मुदतीतील असलेली औषधे, तसेच बालकांशी संबंधित शैक्षणिक व क्रिडाविषयक साहित्य ठेवणेबाबत हमीपत्र
९. वाहनामध्ये दृकश्राव्य (Audio Visual) माध्यमाची व्यवस्था करणे बाबत हमीपत्र

उपरोक्त १ ते ९ मध्ये नमूद करण्यात आलेली सर्व कागदपत्रे, अहवाल या अर्जा सोबत जोडण्यात आली आहेत. तसेच सदर कागदपत्रे बरोबर व खरी असल्याची खात्री करण्यात आलेली आहे. यामध्ये काही तफावत, चूक आढळल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आमच्या संस्थेची राहील. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू

(स्वाक्षरी व शिक्का)
संस्था अध्यक्ष / सचिव

# हमीपत्र

मी प्रतिज्ञापुर्वक कथन आणि घोषित करतो की, रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून फिरते पथक ही योजना राबविणे वावत या संस्थेमार्फत संस्था निवडीच्या निकषानुसार प्रस्ताव सादर करीत आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करण्यात येत आहे.

१. सदर संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे.

२. सदर स्वयंसेवी संस्था व संस्थेचे सभासद हे काळ्या यादीत नाहीत.

३. सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळामधील कोणताही पदाधिकारी/सदस्य हा शासकीय सेवेत नाही.

४. सदर योजनेसाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यंत सदर संस्थेमार्फत स्व-खर्चाने प्रकल्प राबविण्यात येईल, यामध्ये कोणत्याही प्रकारे खंड पडणार नाही.

५. सदर योजनेसाठी संस्थेस शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर संस्थेमार्फत योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांचे पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यात येईल.

६. सदर योजनेसाठी संस्थेस शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर वाहनात केलेल्या सुधारणांबाबत सक्षम यंत्रणेकडून दिलेले प्रमाणपत्र (RTO/authorised Dealer), वाहनाची कागदपत्रे (RC Book/Insurance/Pollution/वाहन सुस्थितीत असलेबाबतचा RTO चे प्रमाणपत्र) योजना कार्यान्वित करतेवेळी सादर करण्यात येईल.

७. सदर योजनेसाठी संस्थेस शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर सदर 'फिरते पथक योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या बाहनामध्ये CCTV Camera तसेच Tracking System या बाबी योजना कार्यान्वित करतेवेळी बसविण्यात येईल.

८. सदर योजनेसाठी संस्थेस शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर वाहनामध्ये अद्ययावत प्रथमोपचार पेटी, विहित मुदतीतील असलेली औषधे, तसेच बालकांशी संबंधित शैक्षणिक व क्रिडाविषयक साहित्य ठेवण्यात येईल.

९. योजना कार्यान्वित होतेवेळी, संस्थेच्या वाहनामध्ये दृकश्राव्य (Audio Visual) माध्यमाची व्यवस्था करण्यात येईल.

या हमीपत्रामध्ये दिलेली सर्व माहिती व कागदपत्रे योग्य व खरी असल्याची खात्री करण्यात आलेली आहे. यामध्ये काही तफावत, चूक आढळल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आमच्या संस्थेची राहील. तसेच यातील कोणत्याही बाबीची पुर्तता न केल्यास सदर संस्थेस देण्यात आलेली मान्यता कोणत्याही वेळी रद्द करण्याचे पुर्ण अधिकार शासनास असतील.

अध्यक्ष / सचिव :

नाव :

पदनाम :

स्वाक्षरी :

**रस्त्यावर राहणा-या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी "फिरते पथक" ही योजना कायमस्वरुपी राबविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बालविकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-बालके-२०२५/प्र.क्र.०२/का.०९**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
**दिनांक- १९ जून, २०२५**

वाचा -

१. महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.बालके-२०२२/प्र.क्र.१०३/का.०९, दि.१९/१२/२०२२

प्रस्तावनाः-

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने तसेच सर्वोच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ६/२०२१ मधील आदेश व राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या निर्देशांची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत "मिशन वात्सल्य" या कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नाविन्यपुर्ण योजना म्हणून "फिरते पथक" हा पथदर्शी प्रकल्प केंद्र शासनाच्या सहाय्याने राज्याच्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, नागपूर व पुणे या ६ जिल्ह्यांत प्रायोगिक तत्तावर संदर्भाधीन क्र.-१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात आली. सदर प्रकल्पास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता राज्यातील रस्त्यावरील मुलांसाठी शिक्षण, सकस आहार, वैद्यकीय मदत, विविध शासकीय योजनांचा लाभ देणे इ. साठी सर्वंकष योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणून व त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वंकष योजना म्हणून फिरते पथक ही योजना राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**१) योजनेचा उद्देश ":-**

सदर रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे फिरते पथक या उपक्रमाच्या माध्यमातून समुपदेशन करून त्यांना त्यांच्या वयानुसार अंगणवाडी, प्राथमिक शाळा यामध्ये दाखल करणे तसेच आवश्यकतेनुसार बालगृहात किंवा खुले निवारागृह येथे दाखल करून त्यांची रस्त्यावरील परिस्थितीतून सोडवणूक करणे व (Formal) औपचारिक शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणे हा आहे. मुलांची वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार योग्य ते वैद्यकीय उपचार करणे, व्यसनाधीनता, कुपोषण, शारीरीक व्यंग इ. समस्या असतील तर सबंधित शासकीय योजनेचा लाभ मिळवून देणे इ.

२) **योजनेचे लाभार्थी :-**

या योजनेंतर्गत खालील सर्व प्रकारच्या काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचें पुनर्वसन करणे अभिप्रेत असल्याने CISS धोरणानुसार तीन श्रेणीमध्ये वर्गीकृत करण्यात आलेली खालील सर्व प्रकारची बालके या योजनेचे लाभार्थी राहतील.

१) **कोणाच्याही मदतीशिवाय रस्त्यावर अगदी एकटी राहणारी मुले :-** या अंतर्गत कुटुंबियांनी सोडून दिल्याने रस्त्यावर राहणारे एकल बालक/विशेष गरजा असलेले बालक, कोणत्याही कारणास्तव घरापासून वेगळी होऊन रस्त्यावर राहणारी स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी छोटी-छोटी कामे करणारी सर्व अनाथ मुले

२) **अशी मुलं जी दिवसभर रस्त्यावर राहतात आणि रात्री जवळपासच्या वस्तीत/झोपडपट्टीत राहणा-या त्यांच्या कुटुंबात परततात :-** बाल कामगार, विटभट्टी कामगारांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले, बाल भिक्षेकरी, कचरा वेचक, रेल्वे स्टेशनच्या फलाटावर राहून छोटी-छोटी काम करणारी मुले, वस्त्या आणि झोपडपट्ट्यांमध्ये कुटुंबासोबत राहणारी आणि रस्त्यावर काम करणारी मुले, वेश्या व्यवसाय करणा-या पालकांची मुले/ वेश्या व्यवसाय ज्या भागात चालतो (रेड लाईट एरीया) त्या भागात राहणारी व तेथील रस्त्यांवर भटकणारी मुले, भावंडांची काळजी घेणारी मुले, रस्त्यावर राहणारी व अंमली पदार्थांचे सेवन करणारी मुले, रस्त्यावर आपली कला सादर करणारी मुले, गाड्यांचे वींड स्क्रीन इत्यादी साफ करणारी मुले, देवस्थानाच्या, तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी हार फुले विकणे/गंध लावणे/ देवांच्या मुर्ती/फ्रेम विकणे/ भिक्षा मागणे तसेच इतर अनेक प्रकारची कामे करणारी मुले, इ.

३) **आपल्या कुटुंबासोबत रस्त्यावर राहणारी मुले:-** आपल्या संपूर्ण कुटुंबासह रस्त्यावर राहणारी सर्व बालके उदा. रस्त्यावर सिग्नलवर उभे राहून, टोल नाक्यावर, रेल्वे ब्रिजवर अथवा रेल्वेमध्ये भिक मागणारी बालके रस्त्याच्या बाजूला छोटा-मोठा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील बालके

३) **योजनेची व्याप्ती :-**

सदर योजनेतंर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता २८ महानगरपालिका क्षेत्रांत प्रत्येकी १ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबई शहरासाठी १, मुंबई उपनगर (पुर्व) साठी १ व मुंबई उपनगर (पश्चिम) साठी १ याप्रमाणे एकूण ३१ "फिरते पथक" सुरु करणे. तद्नंतर नगर पालिका क्षेत्रे व देवस्थाने/ धार्मिक स्थळे यांचा समावेश करुन सदर फिरते पथकांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येईल.

४) **या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत:-**

१. या योजनेसाठी शासनाने मान्यता दिलेल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत (NGO) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी जिल्ह्यातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांसाठी सदर योजना राबवावी.

२. महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजनेंतर्गत निवड झालेल्या संस्थेने २५ मुलांची क्षमता असलेली एक बाल स्नेही ब्रस/व्हॅन (child-friendly bus/van) तयार करावी. बस/व्हॅनवर

**"महिला व बाल विकास विभाग अंतर्गत फिरते पथक"** असे ठळकपणे नमूद केलेले असावे.

३. सदर बस/व्हॅनमध्ये किमान एक समुपदेशक, एक शिक्षक/शिक्षिका, एक वाहन चालक आणि एक काळजी वाहक असे एकूण ४ कर्मचारी उपस्थित असणे आवश्यक राहील. त्यामध्ये किमान २ महिला कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.

४. बस/व्हॅन ची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ६ अशी असेल. सदर व्हॅन जिल्ह्यातील/ शहरातील गर्दीच्या ठिकाणी ज्या ठिकाणी रस्त्यावरील मुलांची संख्या जास्त असेल अशा ठिकाणी फिरेल. मनपा क्षेत्रातील/शहरातील रस्त्यावरील सर्व मुलांना याचा फायदा होईल, असे प्रयत्न व्हावेत.

५. सदर योजना राबवितांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी मुलांच्या सुरक्षेसंबंधी सर्व काळजी घेण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

६. सदर प्रकल्पांतर्गत फिरणारे वाहन व त्यामध्ये नियुक्त कर्मचारी यांची माहिती तसेच सदर वाहन दररोज कोणत्या भागात फिरणार आहे याबाबत नजीकच्या पोलीस स्टेशनला अवगत करण्यात यावे.

७. सदर वाहनात CCTV Camera तसेच GPS Tracking System असावी.

८. सदर उपक्रम राबवताना समुपदेशक व शिक्षक यांनी सर्वप्रथम मुलांच्या पालकांना विश्वासात घेऊन त्यांना व्हॅनमध्ये दाखल करुन घ्यावे.

९. समुपदेशक व शिक्षक यांनी दररोज बालकांची उपस्थिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना तसेच योजनेसाठी तयार केलेल्या गुगल लिंकवर सादर करावी.

१०. समुपदेशक व शिक्षक यांनी बालकांचा **"सामाजिक अन्वेषण अहवाल"** (Social Investigation Report) तयार करुन जिल्हा महिला व बालविकास अधिका-यास सादर करावा. त्यानुसार प्रत्येक बालकाचा वैयक्तिक काळजी आराखडा बनवून त्याच्या पुनर्वसनाबाबत योग्य ते नियोजन करावे.

११. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदर अहवाल तपासून आवश्यकतेनुसार बाल कल्याण समितीला सादर करावा.

१२. या बस / व्हॅनमध्ये दाखल केलेल्या बालकांचे आधार कार्ड काढण्यात यावे. तसेच त्यांची जवळच्या शासकीय रुग्णालयातून वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. तपासणीनुसार आवश्यक ते उपचार करण्यात यावेत. तसेच त्यांच्या वयोगटाप्रमाणे आवश्यक ते लसीकरणही करून घेण्यात यावे.

१३. प्रत्येक मुलाला देण्यात येणारा आहार त्याच्या वयोगटाप्रमाणे पुरेसा असेल तसेच दिले जाणारे अन्न हे ताजे, स्वच्छ रुचकर व पोषक असावे याची दक्षता संस्थेने घ्यावी. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी या संदर्भात पर्यवेक्षण करावे.

१४. या बालकांना साहित्य, गाणी, चित्रकला, नृत्य, गोष्टी इ. माध्यमांद्वारे खेळ व शिक्षणाची गोडी लावावी. तसेच त्यांना नियमितपणे वैयक्तिक स्वच्छता राखणे, नखे कापणे, वारंवार साबणानी हाथ धुणे, रोजच्या रोज स्नान करणे, इ. सवयी लावाव्यात.

१५. सदर बालकांना शिक्षणाची गोडी लागल्यानंतर पालकांच्या संमतीने बालकाच्या वयोगटानुसार जवळच्या अंगणवाडी/ बालवाडी अथवा शासकीय/महानगरपालिका/

नगरपालिका/ नगरपरिषद शाळेत दाखल करण्याचे प्रयत्न शिक्षक आणि समुपदेशक यांनी करावे.

१६.तसेच, आहार व शिक्षण या व्यतिरिक्त मुलांच्या इतर गरजा आढळून आल्यास जसे - व्यसनाधीनता, कुपोषण, काही शारिरीक व्यंग असणे इ. तर त्या बालकास गरजेनुसार संबंधित शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, आवश्यकतेनुसार स्थानिक स्वयंसेवी संस्थाची मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

१७. सदर भेटी दरम्यान अनाथ व एकटे बालक आढळल्यास सदर बालकाला नियमित समुपदेशन करून बाल कल्याण समितीच्या आदेशाने संस्थेमध्ये दाखल करण्यात यावे.

१८. पूर्णत: अनाथ किंवा एकल बालकांचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्यातील तरतूदीनुसार जन्म प्रमाणपत्र काढण्यात यावे.

१९.या बालकांना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड काढून देण्यात यावे.

२०.स्वयंसेवी संस्थेने बस/व्हॅन मधील दाखल मुलांचा तपशील ठेवावा. त्यामध्ये बालकांस पुरविण्यात आलेल्या आरोग्य, शिक्षण तसेच त्यांना दिलेल्या विविध शासकीय सुविधा/ योजना इ. माहिती अंतर्भूत असावी. तसेच याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सादर करावा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी हा अहवाल आयुक्तालयास महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा.

२१.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी संस्थेच्या कामकाजाचा दर ३ महिन्यानी आढावा घेऊन त्याचा अहवाल आयुक्त,महिला व बाल विकास यांना सादर करावा.

२२.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी मुलांची आणि वर नमूद बस/व्हॅन मधील नियुक्त कर्मचारी यांची उपस्थिती/हजेरीपत्रक दरमहा आयुक्तालयास सादर करावे.

२३.बस/व्हॅनमध्ये मुलांच्या करमणुकीसाठी आवश्यक साहित्यासाठी देणगीदाराकडून मदत प्राप्त करुन घ्यावी.

२४.प्रत्येक फिरते पथकास दरमहा किमान २० % बालकांना शालेय संस्थेमध्ये प्रवेश मिळवून देणे बंधनकारक राहील.

२५.सदर योजनेंतर्गत निधीची मागणी करतांना आयुक्त महिला व बाल विकास यांनी यापूर्वी दिलेल्या निधीमधून झालेला खर्च व लाभ दिलेल्या बालकांची जिल्हानिहाय संख्या यांची माहिती सादर करणे आवश्यक राहील. सदर निधी त्रैमासिक पध्दतीने संस्थेच्या खात्यावर थेट वितरीत करण्यात येईल.

२६.वाहनामध्ये अद्ययावत प्रथमोपचार पेटी ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये मुदतीतील असलेली औषधे व इतर साहित्य असावे.

**५) सदर योजनेसाठी स्वयंसेवी संस्था निवडीची प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल.:-**

१) आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने फिरते पथक ही योजना राबविण्यासाठी शासन मान्यतेने जाहिरात प्रसिध्द करुन स्वयंसेवी संस्थांचे अर्ज मागवावेत.

२) जाहिरातीनुसार पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या कार्यरत स्वयंसेवी संस्थांनी विहित नमुन्यात तीन प्रती मध्ये परिपूर्ण अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये जमा करावे.

३) या शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी संस्थेच्या कार्यालयास भेट देऊन तपासणी करावी व संस्थेच्या बालकांसंदर्भात केलेल्या कार्याचा आढावा घेऊन संस्थेचा अनुभव तसेच फिरते पथक राबविण्याची कार्यक्षमता या बाबींवर स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारस करावी. त्या अनुषंगाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी संस्थांचे मूळ अर्ज हमीपत्रासह, स्वत:चा तपासणी अहवाल व संस्थेस मान्यता देण्याच्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह दोन प्रतीत आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर करावा.

४) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी मंजूर करावयाच्या संस्थांची जिल्हानिहाय यादी शासनाकडे मंजूरीस्तव सादर करावी.

५) आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांचेकडून प्रस्ताव सादर झाल्यानंतर शासनाकडून जिल्हानिहाय/महानगरपालिका निहाय संस्थेस मान्यता प्रदान करण्यात येईल.

६) मान्यता प्रदान झाल्यानंतर संस्थांनी प्रत्यक्षात फिरते पथक ही योजना राबविण्याकरिता परिशिष्ट “अ” अंतर्गत नमूद निकषांच्या पुर्ततेनंतर मोबाईल व्हॅन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने व निरीक्षणाखाली सुरु कराव्यात.

७) फिरते पथक योजना राबविणाऱ्या संस्थेला देण्यात येणारी मान्यता प्रथमदर्शनी तीन वर्षासाठी राहील. तद्नंतर मान्यतेच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव तीन महिने अगोदर शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावा लागेल.

८) एका स्वयंसेवी संस्थेस दोन पेक्षा जास्त व्हॅन चालविण्यास मान्यता देण्यात येणार नाही.

९) संस्थेची कार्यपध्दती/प्रगती समाधानकारक नसल्यास संस्थेची मान्यता कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार शासनास राहतील.

१०) संस्थेची निवड करण्याचे निकष सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**६) सदर योजना राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चापोटी शासनमान्य संस्थेस खालीलप्रमाणे निधी अनुज्ञेय राहील:-**

| अ. क्र. | तपशील | संख्या | दर रु. (कमाल) मासिक |
|---|---|---|---|
| १. | बस/व्हॅन | १ | १,००,०००/- |
| २. | समुपदेशक | १ | २५,००० /- |
| ३. | शिक्षक/शिक्षिका | १ | २५,००० /- |
| ४. | वाहन चालक | १ | १५,००० /- |
| ५. | काळजी वाहक | १ | १५,००० /- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | आहार खर्च-२५ मुलांना - २५ दिवस - प्रतिदिन रु. ५०/- याप्रमाणे (२५ X२५X५०) | २५ मुले | ३१,२५० /- |
| ७. | शैक्षणिक साहित्य २५ मुले (प्रतिमाह रु. ५०/- याप्रमाणे) | २५ मुले | १,२५० /- |
| | **एकूण** | | **२,१२,५०० /-** |
| | **२ % (प्रशासकीय खर्च व जाहिरात प्रसिध्दी खर्च)** | | ४,२५०/- |
| | **एकत्रित एकूण** | | **२,१६,७५०/-** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सदर योजना सन २०२५-२६ पासून प्रथम २९ मनपा क्षेत्रांमध्ये राबविण्यासाठी ३१ फिरते पथकांसाठी रु.७,९०,५०,०००/-संस्थाकरीता व २ % प्रशासकीय व जाहिरात प्रसिध्दी खर्च रु.१५,८१,०००/- असा एकूण रु. ८,०६,३१,०००/- (अक्षरी रु. आठ कोटी सहा लाख एकतीस हजार फक्त) एवढा खर्च अपेक्षित असेल. तद्नंतर नगर पालिका क्षेत्रे व देवस्थाने/ धार्मिक स्थळे यांचा समावेश करुन सदर फिरते पथकांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येईल व त्या प्रमाणे खर्चात वाढ होईल.

या योजनेअंतर्गत येणारा खर्च भागविण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्षावर तरतूद करण्यात येईल. सदर योजनेसाठी नियंत्रक अधिकारी उपसचिव/सहसचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई व आहरण व संवितरण अधिकारी कक्ष अधिकारी, रोख शाखा, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई हे असतील.

मा. मंत्रीमंडळाने दि. १३/०५/२०२५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार रस्त्यावरील बालकांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी “फिरते पथक” ही योजना कायमस्वरुपी राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६१९१५४७०४१५३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASAD VINAYAKRAO KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442
, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5D06B6181CF1901CE3E48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2025.06.19 15:47:43 +05'30'

**(प्र. वि. कुलकर्णी)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष/ मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/ मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

८. सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, महिला व बालविकास विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०.आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.सर्व जिल्हाधिकारी.
१२.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१३.सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
१४.सर्व अध्यक्ष, जिल्हा बाल कल्याण समिती (आयुक्तालयामार्फत)
१५.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालयामार्फत)
१६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
१७.निवड नस्ती (का-९)

## परिशिष्ट अ

## सदर योजनेसाठी संस्थेच्या निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर स्वयंसेवी संस्थेची मुंबई विश्वस्त अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.
२. संस्थेची नोंदणी निती पोर्टलवर झालेली असावी.
३. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असावे.
४. सदर स्वयंसेवी संस्थेचे मागील ३ वर्षाचे ऑडिट रिपोर्ट व वार्षिक अहवाल प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.
५. सदर स्वयंसेवी संस्थेची घटना व नियमावली प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.
६. संस्थेच्या नावावर बँकेमध्ये अर्ज करतेवेळी किमान रु.१५.०० लक्ष एवढा बॅलन्स असल्याबाबतचे बँकेचे प्रमाणपत्र जोडलेले असावे.
७. अनुदान प्राप्त होईपर्यंत स्व-खर्चाने प्रकल्प राबविणेबाबतचे हमीपत्र जोडलेले असावे.
८. सदर स्वयंसेवी संस्था व संस्थेचे सभासद हे काळ्या यादीत नाहीत याबाबत प्रमाणपत्र जोडलेले असावे.
९. सदर स्वयंसेवी संस्थेला बाल कल्याण क्षेत्रामधील कामाचा किमान ३ वर्षे अनुभव असावा.
१०. सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळामध्ये कोणताही पदाधिकारी/सदस्य हा शासकीय सेवेत नसावा.
११. संस्थेमधील प्रशिक्षित कर्मचारी (Msw अनुभव असलेला समुपदेशक, पदवी/पदविका धारक शिक्षिका/शिक्षक, किमान १० वी पास व ५ वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव असलेला वाहन चालक व बालकांशी संबंधित कामाचा किमान अनुभव असलेला/असलेली काळजीवाहक) यांची यादी प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.
१२. सदर स्वयंसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस विभाग यांचे चरित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.
१३. सदर योजनेकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनाचा भाडे करारनामा जोडण्यात यावा.
१४. मान्यता मिळाल्यानंतर संस्थेस वाहनात केलेल्या सुधारणांबाबत सक्षम यंत्रणेकडून दिलेले प्रमाणपत्र (RTO /authorised Dealer) वाहनाची कागदपत्रे (RC Book/ Insurance/ Pollution/ वाहन सुस्थितीत असलेबाबतचा RTO चे प्रमाणपत्र) योजना कार्यान्वित करतेवळी सादर करणे बंधनकारक असेल, याबाबतचे हमीपत्र सोबत जोडलेले असावे.
१५. मान्यता मिळाल्यानंतर सदर वाहनामध्ये CCTV Camera तसेच Tracking System योजना कार्यान्वित करतेवळी बसविणे बंधनकारक असेल, याबाबतचे हमीपत्र सोबत जोडलेले असावे.
१६. मान्यतेनंतर संस्थेमार्फत सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तात्काळ सादर करणे बंधनकारक असेल.

१७.वाहनामध्ये अद्ययावत प्रथमोपचार पेटी ठेवणे आवश्यक राहील. यामध्ये मुदतीतील असलेली औषधे, आरोग्य विषयक अत्यावश्यक बाबींचा समावेश असावा. तसेच बालकांशी संबंधित शैक्षणिक व क्रिडाविषयक साहित्य इ. असावे.

१८.सदर वाहनामध्ये दृकश्राव्य (Audio Visual) माध्यमाची व्यवस्था असावी.

*****